# 2020-2021

# Shushma Swaraj Award 2021

# Veera Mandavkar







**नवराष्ट्र**

## उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना सुषमा स्वराज अवॉर्ड

### भाजपा महिला आघाडीचा उपक्रम



यवतमाळ, ब्युरो. प्रदेश अध्यक्ष महिला मोर्चाच्या चित्रा वाघ यांच्या सुचनेप्रमाणे महिला मोर्चा जिल्हा महामंत्री वैशाली खोंड व शहराध्यक्ष उषा खटे यांच्या नेतृत्वात सुषमा स्वराज अवॉर्डचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन आ. मदन येरावार व जिल्हाध्यक्ष नितीन भुतडा यांच्या सहकार्याने झाले. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महिलांना सुषमा स्वराज अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

मागील अनेक वर्षांपासून मनोरुग्णांची सेवा करण्याचे निःस्वार्थ काम करणाऱ्या नंदादीप फाउंडेशनच्या नंदिनी शिंदे यांच्या कामाची दखल घेत त्यांचा सन्मान करण्यात आला. तसेच समाजसेविका कीर्ती पदमावर, ललिता घोडे, माणिक मेहरे, सुधा खोडके, आरती गंधे, ठाणेदार दीपमाला भेंडे, डॉ. किरण कोथळे, संध्या दीपक सव्वालाखे, शीतल जयस्वाल, वीरा मांडवकर, सविता हजारे, प्राची बनगिनवार, सोनल देशमुख, वर्षा ईंगोले, वर्षा चौधरी, कल्पना कोल्हारे, प्रणिता जोशी या कर्तृत्ववान महिलांना सुषमा स्वराज अवॉर्ड देऊन सन्मानित केले. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष माया शेरे यांनी केले.

यावेळी प्रदेश उपाध्यक्ष रेखा कोठेकर, जिल्हा परिषद सदस्य रेणू शिंदे, कीर्ती पदमावार, वैशाली खोंड, शहर पदाधिकारी मीनल पांडे, सुनीता मडावी, भरती जाठे, प्रांजली राऊत, रेखा नांदुरकर, प्रणीता खडसे, नंदा जिरापुरे, लता ठोंबरे यांच्यासह महिला पदाधिकारी व महिला उपस्थित होत्या.

### वेशभूषा स्पर्धेचे बक्षीस वितरण

यावेळी महिलांसाठी वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये होय मी जिजाऊ बोलते, झाशीची राणी, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, लता मंगेशकर अशा वेशभूषा करुन त्यांनी आपला परफॉर्मन्स दिला. त्यामध्ये प्रथम क्रमांक स्मीता बोबडे, द्वितीय सोनल देशमुख, तृतीय विशाखा येवतकर, तर प्रोत्साहनपर बक्षिस स्वाती हुडाखे, अश्विनी भाकरे यांना देण्यात आले.